

वा स्तु रं ग

अनेक वेळा मुलांमध्ये चांगली कुवत, क्षमता असूनही किंवा चांगली मेहनत घेऊनही अपेक्षित यश मिळत नाही आणि अपेक्षाभंगाचे दु:ख सहन करण्याची पाळी आपल्यावर येते. ते टाळण्यासाठी प्रत्येक बारीकसारीक गोष्टींत काळजी घेतल्यास अपयश चार हात दूर ठेवण्यात नक्कीच यश मिळू शकते. यासाठी प्रकर्षाने वास्तुशास्त्राचा तुमच्या शैक्षणिक प्रगतीवर होणाऱ्या प्रभावाचा नक्कीच विचार करणे आवश्यक ठरते.

# वास्तुशास्त्र व शैक्षणिक प्रगती

आजच्या स्पर्धात्मक युगात मुलांची शैक्षणिक प्रगती ही बाब मुलांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठीही चिंतेचा विषय बनलेली आहे. शाळाप्रवेशापासून हा प्रश्न पालक आणि पाल्य या दोघांना त्रास द्यायला सुरुवात करतो. शाळाप्रवेशासाठी परीक्षा व मुलाखतीला सामोरे जाण्यासाठी पालक व पाल्य यांची पूर्वतयारीसाठी धावपळ, त्यानंतर डोनेशनची पूर्तता करताना होणारी पालकांची दमछाक, यावरच हे थांबत नाही तर प्रत्येक वर्गात, प्रत्येक परीक्षेत आपले मूल सर्वांच्या वरचढ असावे यासाठीचा अट्टहास, त्यात जेव्हा हा पाल्य दहावी-बारावीला पोहोचतो तेव्हा तर मुलांपेक्षा पालकांचेच टेन्शन परमोच्च पातळीवर पोहोचते. काही ठिकाणी पालकांच्या अपेक्षांचा अतिरेकही होताना आपण पाहतो. त्यानंतर व्यावसायिक शिक्षणाच्या प्रवेशासाठी धडपड, पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश परीक्षा यासाठी लागणारे आर्थिक पाठबळ मिळवण्यासाठी पालकांना आपले कंबरडे मोडावे लागते. मध्यमवर्गीय आपल्या रोजच्या जीवनात काटकसर करून, बँकेतून कर्ज घेऊन आपल्या मुलांना चांगले उच्चशिक्षण अथवा परदेशात ॲडमिशन मिळावी यासाठी धडपडत असतात. या सर्व घडामोडींत कधी अचानकपणे मुलांच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख अनपेक्षितपणे खाली येतो तर अनेक वेळा चांगली कुवत, क्षमता असूनही किंवा चांगली मेहनत घेऊनही अपेक्षित यश मिळत नाही आणि अपेक्षाभंगाचे दु:ख सहन करण्याची पाळी आपल्यावर येते. ते टाळण्यासाठी प्रत्येक बारीकसारीक गोष्टींत काळजी घेतल्यास अपयश चार हात दूर ठेवण्यात नक्कीच यश मिळू शकते. यासाठी प्रकर्षाने वास्तुशास्त्राचा तुमच्या शैक्षणिक प्रगतीवर होणाऱ्या प्रभावाचा नक्कीच विचार करणे आवश्यक ठरते.

आपण राहतो ती वास्तू आपल्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लावते का? ते पाहणे जरूरीचे आहे. आपल्याला आलेल्या अपयशाची कारणे शोधण्याआधी काही मुद्द्यांचा विचार करणे महत्त्वाचे आहे.

* योग्य सुविधा देऊ करूनही आपले पाल्य अपेक्षित यश मिळवू शकला नाही का? * गुणवत्तेचा आलेख अचानक खाली


वास्तुशास्त्र एज्युकेशन रिचर्स फाऊंडेशन







घसरला का? * नवीन घरात राहायला आल्यावर शैक्षणिक प्रगतीवर चांगला अथवा वाईट परिणाम झाला आहे का? * मुलांची अभ्यासाला बसण्याची जागा व दिशा योग्य आहे का? * आपल्या पाल्यामध्ये अधिक प्रावीण्य मिळविण्याची क्षमता आहे का? * मेहनतीच्या मानाने यश कमी मिळते का?

या मुद्द्यांचा आपण विचार केलात तर असे लक्षात येईल की, आपल्या निवासस्थानाचे वास्तुशास्त्र शैक्षणिक प्रगतीला (चांगला अथवा वाईट) कारणीभूत ठरत असते.

### कोणत्याही अभ्यासासाठी योग्य दिशा व रचना

आपल्या घरातील ईशान्य दिशेच्या एकंदरीत रचनेवर तुमच्या मुलाची शैक्षणिक प्रगती अवलंबून असते. ईशान्य दिशेस प्रवेश, पाणी व पूजा या तीन गोष्टी प्रामुख्याने असणे एकंदरीत प्रगतीच्या दृष्टीने फारच चांगले असते. वास्तुशास्त्रानुसार ईशान्य दिशा म्हणजे उत्तर व पूर्व यांच्यामधील दिशा. ईशान्य दिशा हे जलतत्त्वाचे स्थान. या दिशेत भूगर्भांतर्गत पाण्याचा साठा म्हणजे ऐश्वर्य व यशप्राप्तीची हमखास खात्री तसेच जेव्हा आपण देवपूजा करतो अथवा देवाला नमस्कार करतो त्या वेळी आपला चेहरा ईशान्य दिशेकडे असावा. ईशान्य दिशा वास्तुशास्त्रीय दृष्टिकोनातून दोषमुक्त असल्यास शैक्षणिक प्रगती चांगली होते. त्यामुळे एकाग्रता, आकलनशक्ती व विचारशक्ती वाढविण्यास उपयुक्त ठरते. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे या विश्वाला सकारात्मक ऊर्जा ही ईशान्य दिशेतूनच मिळत असते. त्यामुळे ही ऊर्जा जेव्हा आपण ईशान्य दिशेला तोंड करून अभ्यास करतो त्या वेळी ती आपल्या सहस्रकार चक्रातून आपल्या शरीरात प्रवेश करते ज्यामुळे आपले तन आणि मन प्रफुल्लित होते व आपली कार्यक्षमता वाढविते व त्याचा परिणाम शैक्षणिक प्रगतीस लाभदायी ठरतो.

### अभ्यासाकरिता योग्य जागा

* नैर्ऋत्य दिशेत बसून ईशान्य दिशेला तोंड असणे अभ्यासासाठी सर्वोत्तम. * अभ्यास करते वेळी नैर्ऋत्य दिशेत पाठीला भिंतीचा भक्कम आधार असावा व समोर ईशान्य मोकळी असावी. * अभ्यास करते वेळी डोक्यावर बीम अथवा भिंतीतून बाहेर आलेली कपाटे नसावी. ती हानीकारक असतात. * वायव्य दिशेची खोलीसुद्धा अभ्यासिका म्हणून चांगली असते. मात्र तोंड ईशान्य किंवा पूर्व दिशेलाच असणे आवश्यक आहे. * जर वरील पर्याय उपलब्ध होत नसतील तर ईशान्य दिशेची खोली, त्याच दिशेच्या भिंतीला, त्याच दिशेकडे तोंड करून बसणे अत्यंत लाभदायक. * अभ्यास करते वेळी समोरच्या भिंतीवर शोभिवंत वस्तू अथवा इतर कोणत्याही गोष्टीचा गजबजाट नसावा. समोरचे वातावरण एकदम मोकळे व प्रसन्न असावे. * अभ्यासाच्या टेबलावर साधा प्लास्टिकचा, तांब्याचा अथवा स्फटिकाचा पिरॅमिड ठेवल्यास चांगला फायदा होतो. समोर भिंतीवर सरस्वतीचा फोटो अथवा यंत्र लावल्यास अतिउत्तम.

* विद्यार्जनासाठी व शैक्षणिक प्रगतीसाठी ईशान्य दिशा अत्यंत लाभदायक आहे हे एव्हाना आपल्या लक्षात आले असेल, परंतु या दिशेचे वास्तुदोष मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर विपरीत परिणाम घडवीत असतात. मात्र या दोषांचे निराकरण करता येते व शैक्षणिक प्रगतीकडे येणारे अडथळे दूर करून प्रगतीचा मार्ग सोपा करता येतो.

✿✿✿